जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 NOV 2023
लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी उद्योजक सचिन मेनन यांच्या वतीने संभाजी पाटील यांनी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे निधी सुपूर्द केला. यावेळी रणजित यादव, डॉ. गिरीश कुलकर्णी आणि प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

# 'लोकस्मृती' वसतिगृहाला साडेसहा लाखांचा निधी

## सचिन मेनन यांचे दातृत्व : मदतीचा ओघ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थी वसतिगृहासाठी मदतनिधीचा ओघ विद्यापीठ कार्यालयाकडे सुरू झाला आहे. कोल्हापुरातील नामांकित उद्योगसमूह असलेल्या मेनन पिस्टन्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सचिन मेनन यांनी साडेसहा लाख रुपयांचा निधी काल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे गुरुवारी सुपूर्द केला.

मेनन यांनी विद्यापीठास साडेसहा लाख रुपयांचा निधी विद्यापीठास दिला. मेनन यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी संभाजी पाटील यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे निधीचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह डॉ. गिरीश कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव हे उपस्थित होते.

24 NOV 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योजक मेनन यांच्याकडून वसतिगृहासाठी निधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थी वसतिगृहासाठी मदत निधीचा ओघ विद्यापीठाकडे सुरू आहे. मेनन पिस्टन्स लि; कंपनीचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक सचिन मेनन यांनी साडेसहा लाख रुपयांचा निधी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.



सचिन मेनन यांच्या वतीने कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे निधी देताना संभाजी पाटील.

शिवाजी विद्यापीठाने लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह हा सुमारे शंभर विद्यार्थिनींच्या निवास व्यवस्थेसाठीचा प्रकल्प प्रस्तावित केला आहे. हे वसतिगृह लोकांच्या सहभागातून उभारावे आणि त्यातून लोकांच्या स्मृती जतन केल्या जाव्यात, अशा हेतूने विद्यापीठाने या वसतिगृहाची संकल्पना मांडली. लोकांनी आपले कुटुंब, आप्तस्वकीय यामधील प्रिय व्यक्तीच्या नावे ठरावीक निधी विद्यापीठाकडे द्यावयाचा आणि त्या व्यक्तीच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करावयाची, अशी ही संकल्पना आहे. यानुसार मेनन यांनी विद्यापीठास साडेसहा लाख रुपयांचा निधी दिला आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह डॉ. गिरीश कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव उपस्थित होते.

24 NOV 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘लोकस्मृती’ वसतिगृहासाठी मदतीचा ओघ

## शिवाजी विद्यापीठ : उद्योजक सचिन मेनन यांच्याकडून साडेसहा लाख

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थी वसतिगृहासाठी मदतनिधीचा ओघ विद्यापीठ कार्यालयाकडे सुरू झाला आहे. मेनन पिस्टन्स लिमिटेड कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक सचिन मेनन यांनी साडेसहा लाख रुपयांचा निधी दिला आहे.

मेनन यांचे प्रतिनिधी संभाजी पाटील यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची भेट घेऊन त्यांच्याकडे निधीचा धनाकर्ष बुधवारी सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, गिरीश कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी उद्योजक सचिन मेनन यांच्यातर्फे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे संभाजी पाटील यांनी निधी सुपूर्द केला. यावेळी शेजारी रणजित यादव, गिरीश कुलकर्णी, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

विद्यापीठाने लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह हा सुमारे शंभर विद्यार्थिनींच्या निवास व्यवस्थेसाठीचा प्रकल्प प्रस्तावित केला आहे. हे वसतिगृह लोकांच्या सहभागातून उभारावे आणि त्यातून लोकांच्या स्मृती जतन केल्या जाव्यात, अशा हेतूने विद्यापीठाने या वसतिगृहाची संकल्पना मांडली. लोकांनी आपले कुटुंब, आप्तस्वकीय यांमधील प्रिय व्यक्तीच्या नावे ठराविक निधी विद्यापीठाकडे द्यावयाचा आणि त्या व्यक्तीच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करावयाची, अशी ही संकल्पना आहे.

> शिवाजी विद्यापीठाशी संबंधितांसह समाजातील विविध संस्था-संघटनांशी तसेच उद्योग-व्यवसायांशी निगडित घटकांकडूनही लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह प्रकल्पास मदत करण्याबाबत विचारणा झाली आहे. त्यामुळे विद्यापीठामध्ये शंभर टक्के लोकसहभागातून साकारत असलेला हा प्रकल्प कोल्हापूरकरांच्या दातृत्वातून निश्चितपणे पूर्णत्वास जाईल. इच्छुक दात्यांनी लोकस्मृती वसतिगृहास आर्थिक मदतीसाठी पुढे यावे.
>
> **-डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 NOV 2022
तरुण भारत

# ऐतवडे खुर्दच्या वारणा महाविद्यालयास नॅकचा अ दर्जा




कोल्हापूर : प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, डॉ. पी. टी. पाटील,बाबासो पाटील, डी एस पाटील यांचा सत्कार करताना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी, यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ डी. टी. शिर्के व इतर

प्रतिनिधी
वारणानगर

शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या सत्कार सोहळ्यात सांगली जिल्ह्यातील ऐतवडे खुर्द ता. वाळवा येथील वारणा महाविद्यालयास नॅकचा अ दर्जा प्राप्त करणारे महाविद्यालय म्हणून सत्कार करण्यात आला.

ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या वारणा महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकनामध्ये अ दर्जा प्राप्त झाला आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांचा सत्कार झाला.

महाविद्यालयाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक उपक्रमा बरोबरच अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये आधार सामाजिक केंद्राच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजना व अन्य योजना राबविण्यात आल्या. बापूजी स्मृती व्याख्यानमाला, संवाद व्यासपीठ अशा विविध माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, प्राध्यापक कार्यरत आहेत. या सत्कारप्रसंगी शिवाजी विद्यापीठामध्ये वारणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. पी. टी. पाटील, बाबासो पाटील, आप्पासाहेब खराडे यांच्याबरोबरच सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर वर्ग उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 NOV 2023

पुढारी

# डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची विद्यापीठास अभ्यास भेट

कोल्हापूर : डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठास क्षेत्र अभ्यास भेट दिली. प्रात्यक्षिक ज्ञान व स्टार्टअप इकोसिस्टमच्या प्रत्यक्ष प्रदर्शनाच्या शोधात डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, साळोखेनगरच्या ६० विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या नवउपक्रम, नवसंशोधन आणि कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रास भेट दिली. केंद्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी उद्योजकीय लँडस्केप नेव्हिगेट करण्याबद्दलचे त्यांचे कौशल्य, स्टार्टअप आरंभ, आव्हाने, यशासाठी धोरणे यांविषयी महत्त्वाची माहिती दिली. केंद्र संचालक प्रा. डॉ. आर. जी. पवार, कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अभिजित गाताडे, विष्णू खाडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 NOV 2023
लोकमत

# ज्येष्ठांसाठी विद्यापीठात योग व निसर्गोपचार शिबिर

कोल्हापूर : ज्येष्ठ नागरिकांच्या विविध प्रश्नांबाबत शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडून ज्येष्ठ नागरिकांच्या निरोगी व निरामय आयुष्यासाठी योग व निसर्गोपचार शिबिर शिक्षणशास्त्र सभागृहात झाले.

शिबिरासाठी फेसकॉमचे समन्वय समितीचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष दिलीप पेटकर, सचिव श्रीकांत अडिवरेकर प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार होते. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांवर योग, निसर्गोपचारांमधून विनाऔषधी उपचार कसे केले जातात यावर ॲक्युप्रेशर तज्ज्ञ अरविंद पालके यांनी मार्गदर्शन केले. प्रात्यक्षिकाद्वारे निसर्गोपचार, ॲक्युप्रेशर व योगच्या पद्धती ज्येष्ठांना शिकवल्या. डॉ. रामचंद्र पवार यांनी विभागाच्या वतीने सुरू असलेल्या विविध कोर्सची माहिती दिली. यावेळी टी. आर. गुरव, श्रीकांत अडिवरेकर यांची भाषणे झाली. रवींद्र खैरे यांनी सूत्रसंचालन केले. सहायक प्राध्यापक यशोधन बोकील यांनी आभार मानले. यावेळी वसंत सिंघन, आर. एम. जाधव, उदय घाटे, सुधाकर भोसले, मंगल पाटील, डॉ.श्वेतालिना पाटील, रामचंद्र पाटील, बाळासाहेब पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 NOV 2023
पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला ६,१८८ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेला गुरुवारी ६ हजार १८८ विद्यार्थी परीक्षेला बसले. त्यापैकी ६२ विद्यार्थी गैरहजर राहिले.

मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग, मास्टर आर्टस् (भाषा प्रद्योगिकी) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. दरम्यान, दि. २३ रोजी बॅचलर ऑफ इंटिरिअर डिझाईन विविध सत्रांचे निकाल जाहीर झाले. आजअखेर ७७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत. भरारी पथकाकडून सांगली-४, सातारा- ३ अशा ७ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीने केल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 NOV 2022
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय नेमबाजी स्पर्धेत अनुष्काला दोन सुवर्ण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय नेमबाजी स्पर्धेत कोल्हापूरच्या अनुष्का पाटीलने शानदार कामगिरी करत दोन सुवर्ण पदकांची कमाई केली. दुधाळी शुटींग रेंजमध्ये झालेल्या या स्पर्धेचे शहाजी कॉलेजने आयोजन केले होते. यामध्ये अनुष्काने १० मीटर एअर पिस्टल आणि २५ मीटर स्पोर्टस् पिस्टल या प्रकारात प्रत्येकी १ सुवर्ण पदक जिंकले. गडहिंग्लजमधील शिवराज महाविद्यालयातून तीने स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले होते. या स्पर्धेत सुवर्ण पदकांना गवसणी घातलाना अनुष्काने एअर पिस्टल प्रकारात ४०० पैकी ३७५ व स्पोर्टस् पिस्टल प्रकारात २०० पैकी १८९ गुणांची कमाई केली आहे. या सर्वोत्तम कामगिरीमुळे अनुष्काची पुढील दोन मोठ्या स्पर्धांसाठी शिवाजी विद्यापीठ संघामध्ये निवड केली आहे. या संघातून ती दिल्ली येथे ६ ते ११ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत २५ मीटर स्पोर्टस् पिस्टल या प्रकारातून प्रतिनिधीत्व करणार आहे. तसेच कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे ३ ते ८ जानेवारी दरम्यान, होणाऱ्या पश्चिम व दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेतही ती १० मीटर एअर पिस्टल या प्रकारातून उतरणार आहे. अनुष्काला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरु प्रमोद पाटील, विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एस. कदम व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. राहूल मगदूम यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

